महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक २०/०९/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.एपीओ-०८२१/प्र.क्र.१६/पोल-३ दि.१९ सप्टेंबर २०२४

**विषय :-** पोलीस आयुक्त, पिपरी चिंचवड यांच्या आस्थापनेवर अंमली पदार्थ व गुन्हे शोधाकरिता श्र्वान पथक निर्माण करणे व त्यासाठी ९ नियमित पदे निर्माण करण्यास व १ मनुष्यबळ सेवा बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यास व त्याकरीता येणाऱ्या आवर्ती व अनावर्ती खर्चास मान्यता देणबाबत.

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र क्र.एपीओ-०८२१/प्र.क्र.१६/पोल-३,दि. १९ सप्टेंबर २०२४ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०९१९१५१३१४६२२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )

पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड.

कार्यासन अधिकारी, का.क्र. २६-ब

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांच्या आस्थापनेवर अंमली पदार्थ व गुन्हे शोधाकरिता श्वान पथक निर्माण करणे व त्यासाठी ९ नियमित पदे निर्माण करण्यास व १ मनुष्यबळ सेवा बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यास व त्याकरिता येणा-या आवर्ती व अनावर्ती खर्चास मान्यता देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः एपीओ-०८२१/प्र.क्र.१६/पोल-३**

मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई

दिनांक : १९ सप्टेंबर, २०२४.

संदर्भ :-

१) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक एपीओ-०८१६/प्र.क्र.१०३/पोल-३, दिनांक २८.०५.२०१८.

२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/२६-ब पिंपरी चिंचवड/श्वान पथक/३५/२०२०, दि.१२.११.२०२१, दि.०८.०६.२०२३.

३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील दि.०९.०७.२०२४ रोजी झालेल्या सन २०२४ मधील पहिल्या बैठकीचे कार्यवृत्त.

४) वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.अनौसं-५३४/आपुक, दिनांक २१.०८.२०२४.

प्रस्तावना :-

पोलीस आयुक्त, पुणे शहर व पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्राचे विभाजन करुन, पिंपरी चिंचवड शहर व परिसराकरिता स्वतंत्र "पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय" निर्माण करण्यास संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

२. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांच्या कार्यक्षेत्रातील अंमली पदार्थांची विक्री/सेवन/व्यापारास प्रतिबंध करण्याकरिता व विविध गुन्ह्यांच्या तपासाकरिता पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड आस्थापनेवर अंमली पदार्थ शोध व गुन्हे शोधाकरिता श्वान पथक निर्माण करणे व त्याकरिता पदनिर्मितीचा प्रस्ताव उपरोक्त संदर्भाधीन क्र.२ अन्वये शासनास प्राप्त झाला आहे.

३. त्यानुसार उक्त प्रस्तावास अपर मुख्य सचिव (सेवा/सा.प्र.वि.) यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीच्या दि.१५.०४.२०२४ रोजीच्या बैठकीत व मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील दि.०९.०७.२०२४ रोजी झालेल्या उच्च स्तरीय सचिव समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानुषंगाने पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड आस्थापनेवर अंमली पदार्थ शोध व गुन्हे शोधाकरिता श्वान पथक निर्माण करणे व त्याकरिता पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

**शासन निर्णयः-**

पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांच्या आस्थापनेवर अंमली पदार्थ शोध व गुन्हे शोधाकरिता श्वान पथक निर्माण करण्यास, त्याकरिता खालील नमूद एकूण ९ नियमित पदे व १ मनुष्यबळ सेवा बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

**अ) नियमित पदे :-**

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | प्रस्तावित पदे |
|---|---|---|---|
| १. | **अंमली पदार्थ शोधक पथकाकरिता पदे** | | |
| | पोलीस हवालदार | एस-९:२६४००-८३६०० + विशेष वेतन रु. ७५०/- | ०२ |
| | पोलीस शिपाई | एस-७:२१७००-६९१०० + विशेष वेतन रु. ७५०/- | ०२ |
| २. | **गुन्हे शोध पथकाकरिता पदे** | | |
| | पोलीस उप निरीक्षक | एस-१४:३८६००-१२२८०० | ०१ |
| | पोलीस हवालदार | एस-९:२६४००-८३६०० + विशेष वेतन रु. ७५०/- | ०२ |
| | पोलीस शिपाई | एस-७:२१७००-६९१०० + विशेष वेतन रु. ७५०/- | ०२ |
| **एकूण** | | | ०९ |

**ब) बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा :-**

| अ.क्र. | पदनाम | मनुष्यबळ संख्या |
|---|---|---|
| १ | सफाई कामगार | १ |

२. त्यानुषंगाने येणा-या रु.४८,५४,३२०/- (रुपये अठ्ठेचाळीस लाख चोपन्न हजार तीनशे वीस फक्त) इतक्या आवर्ती खर्चास व रु.६०,५७,३१६/- (रुपये साठ लाख सत्तावन्न हजार तीनशे सोळा फक्त) इतक्या अनावर्ती खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. उक्त आवर्ती व अनावर्ती खर्च हा त्या त्या वर्षीच्या उपलब्ध मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. बाह्ययंत्रणेद्वारे सेवा घेताना, वित्त विभागाच्या दि.२७.०४.२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

५. उक्त शासन निर्णय मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीच्या दिनांक ०९.०७.२०२४ रोजी झालेल्या सन २०२४ मधील पहिल्या बैठकीतील मान्यतेनुसार व वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.अनौसं-५३४/आपुक, दिनांक २१.०८.२०२४ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.



Scanned with CamScanner

६. उक्त शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०९१९१५१३१४६२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA T BHALWANE

Digitally signed by RAJENDRA T BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16daf99520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095559A6CDFAC8568155180CD188C23A, cn=RAJENDRA T BHALWANE
Date: 2024.09.19 15:14:04 +05'30'

(रा. ता. भालवणे)
उप सचिव, गृह विभाग

प्रत,

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,वांद्रे,मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/पिंपरी चिंचवड.
उप सचिव(पोल ३/अर्थसं-१),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.
वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१/आ.पु.क.
निवड नस्ती, पोल-३.



Scanned with CamScanner